परिशिष्ट २

# निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम

# नियमावली

## सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) समन्वय समिती

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे**

# निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम नियमावली

**१. संक्षिप्त शिर्षक आणि आरंभ**

१) या नियमावलीस "निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम नियमावली २०१३" असे संबोधण्यात येईल.

२) ही नियमावली शैक्षणिक वर्ष २०१३—१४ पासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

**या नियमावलीमध्ये**

१) **"अधिनियम"** म्हणजे महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३.

२) **"परिनियम"** म्हणजे महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम, १९९०.

३) **"विद्यापीठ"** म्हणजे महाराष्ट्रातील शासन निर्णयानुसार निर्माण झालेली कृषि विद्यापीठे

४) **"अभ्यासक्रम"** म्हणजे प्रमाणपत्र देण्याकरीता आवश्यक व नेमलेल्या पाठयक्रमानुसार तयार केलेली विषय मालिका.

५) **"शैक्षणिक वर्ष"** म्हणजे पाठयक्रमाच्या शिक्षणाबाबत विद्यापीठाने निर्देशित केलेले वर्ष.

६) **"वर्गाचे तास"** म्हणजे ६० मिनिटे वेळ मर्यादेचा बौध्दिक अभ्यासक्रम, १२० मिनिटे मर्यादेची प्रात्यक्षिके आणि १२० मिनिटे कालावधीचा कार्यानुभव.

७) **"शिक्षण संचालक"** विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रमुखास **शिक्षण संचालक** असे संबोधण्यात येईल.

८) **"सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण)"** विद्यापीठाच्या निम्नस्तर कृषि शिक्षण शाखेच्या प्रमुखास **सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण)** असे संबोधण्यात येईल.

९) **"सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) समन्वय समिती"** महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांच्या निम्नस्तर कृषि शिक्षण शाखेचे प्रमुख असलेल्या सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्या समितीस **"सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) समन्वय समिती"** असे संबोधण्यात येईल

१०) **"प्राचार्य"** कृषि तंत्र विद्यालयाच्या प्रमुखास **प्राचार्य** असे संबोधण्यात येईल.

११) **"कुलसचिव"** म्हणजे विद्यापीठाच्या प्रशासन प्रमुखास **"कुलसचिव"** असे संबोधिण्यात येईल.

१२) **"विद्यार्थी"** म्हणजे अशी व्यक्ती ज्याने विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संस्थेमध्ये निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी केली आहे आणि ज्याला विद्यापीठाकडून पदविका /प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे.

१३) **"घटक कृषि तंत्र विद्यालय"** म्हणजे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आणि विद्यापीठाच्या थेट नियंत्रणाखाली असलेले विद्यालय

१४) **"संलग्न अनुदानित कृषि तंत्र विद्यालय"** म्हणजे महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आणि विद्यापीठाशी संलग्न असलेले आणि शासनाकडून अनुदान मिळण्यास पात्र असलेले विद्यालय

१५) **"संलग्न विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतन"** म्हणजे महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आणि विद्यापीठाशी संलग्न असलेले परंतु शासनाकडून कोणताही अनुदान मिळण्यास पात्र नसलेले विद्यालय

१६) जे शब्द आणि वाक्य प्रमाणके अधिनियम, परिनियम आणि नियम यात वापरलेले आहेत, पण त्यांच्या व्याख्या या नियमांत केलेल्या नाहीत. त्याचा अर्थ अधिनियम, परिनियम व नियमांत दिल्याप्रमाणे त्या त्या तरतुदीप्रमाणे असेल.

**३. शैक्षणिक वर्ष, प्रवेश व विद्यार्थ्यांची नोंदणी**

१) निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रमांचे पहिले शैक्षणिक वर्ष ऑगस्टमध्ये सुरू होऊन पुढील वर्षाच्या मे महिन्यापर्यत संपेल, द्वितीय व तृतीय वर्षाचे शैक्षणिक वर्ष जून महिन्यामध्ये सुरू होऊन एप्रिल/मे मध्ये संपेल. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला उपकुलसचिव (विद्या) हे शैक्षणिक वर्षाची सुरूवात आणि शेवट, प्रवेश नोंदणी, परीक्षा, सुटटया इत्यादींचा समावेश असलेली शैक्षणिक दिनदर्शिका तयार करतील व सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्यामार्फत सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) समन्वय समितीला सादर करतील. समन्वय समितीच्या मंजूरीनंतर उपकुलसचिव (विद्या) हे सर्व संबंधिताना कळवतील.

२) अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांची निवड महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांना व आरक्षण धोरणाच्या अधिन राहून संमत केलेल्या आणि विद्या/कार्यकारी परिषदेने मंजूर केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार केली जाईल.

३) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाची १० वी शालांत परीक्षा अथवा समकक्ष उत्तीर्ण झालेला विद्यार्थी कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकेल. तर नववी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकेल.

४) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित जिल्हयातील रहिवाशी विद्यार्थी त्या जिल्हयातील विद्यालयात/तंत्र निकेतनात प्रवेशासाठी पात्र राहील. माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम/कृषि विज्ञान पदविकेसाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील रहिवाशी विद्यार्थी पात्र राहील.

५) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी अर्जदाराने इयत्ता १० वी शालांत परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण केली असेल तर त्याचा गुणवत्ता क्रम ठरविताना मिळविलेले एकूण गुण विचारात घेतले जातील. तथापि, कमी प्रयत्न असलेल्या विद्यार्थ्याला अग्रक्रम दिला जाईल.
माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी अर्जदाराने इयत्ता ९ वी परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण केली असेल तर त्याचा गुणवत्ता क्रम ठरविताना मिळविलेले एकूण गुण विचारात घेतले जातील. तथापि, कमी प्रयत्न असलेल्या विद्यार्थ्याला अग्रक्रम दिला जाईल.

६) प्रवेश घेते वेळी उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा कमी असावे. प्रवेशाचे वेळी उमेदवाराचे वय ३० वर्ष पूर्ण किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर उमेदवाराला प्रवेश दिला जाणार नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वयाची अट ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील. माजी सैनिकांसाठी प्रवेश घेते वेळीचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असावे.

७) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविकेसाठी प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे अनिवार्य असेल. विद्यापिठ स्तरीय स्थळ प्रवेश प्रक्रियेनंतर जागा रिक्त राहिल्यास विद्यापीठाच्या परवानगीने संबंधित संस्थेने स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन सदर रिक्त जागा महाराष्ट्र शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार भरणे बंधनकारक असेल. सदर आरक्षण धोरण न पाळल्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

८) निवड झालेल्या विद्यार्थ्याला शासनाने/विद्यापीठाने वेळोवेळी ठरवून दिलेले प्रवेश शुल्क, शैक्षणिक शुल्क, वसतिगृह शुल्क, परीक्षा शुल्क तसेच इतर शुल्क भरावे लागेल.

९) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविकेसाठी निवड झालेले उमेदवार संबंधित कृषि तंत्र विद्यालयाच्या/निकेतनाच्या प्राचार्याकडे तर माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरीता संस्थेच्या प्रमुखाकडे प्रवेशासाठी आणि नोंदणीसाठी संपर्क साधतील. हा संपर्क उमेदवाराने विद्यापीठाच्या सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांनी घालून दिलेल्या कालमर्यादेत साधावयाचा आहे आणि नोंदणीसाठी आवश्यक ती माहिती मिळवावयाची आहे.

१०) विद्यार्थ्याची नोंदणी म्हणजे

अ) विद्यार्थ्याने शासनाने/विद्यापीठाने वेळोवेळी ठरवून दिलेले प्रवेश शुल्क, शैक्षणिक शुल्क, वसतिगृह शुल्क, परीक्षा शुल्क तसेच इतर शुल्क भरणे

ब) प्रवेश घेताना विद्यार्थ्याने स्वत: हजर राहाणे आवश्यक आहे.

क) द्वितीय अथवा तृतीय वर्षामध्ये विहित शुल्क भरून प्रवेश घेण्याचा कालावधी शैक्षणिक वर्षाचे सुरूवातीपासून पहिले तीन दिवस राहील. त्यानंतर विद्यार्थ्यांना निर्धारित कालावधी नंतर पुढील कार्यालयीन कामाचे दहा दिवसापर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) अतिरिक्त विलंब शुल्क ₹ ५०/— प्रति दिन भरून प्रवेश नोंदणी करता येईल. या कालावधीनंतर विद्यार्थ्यांना प्रवेश नोंदणी करता येणार

नाही. अतिरिक्त विलंब शुल्क हे सर्व विद्यालयाने उशिरा नोंदणीच्या प्रस्तावासह विद्यापीठाकडे जमा करावे.

ड) प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला वैद्यकीय तपासणी व विद्यार्थी सुरक्षा विमा हे सक्तीचे आहे.प्रत्येक विद्यार्थ्याची वैद्यकीय तपासणी संबंधित विद्यालयांनी/तंत्र निकेतनानी जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून पहिल्या सहा महिन्याच्या आत करून घ्यावी व वैद्यकीयदृष्टया तंदुरस्त असल्याचे प्रमाणपत्र विद्यापीठास सादर करावे. वैद्यकीय तपासणीत विद्यार्थी सदोष आढळल्यास संबंधित विद्यालयाचे प्राचार्य / प्रभारी अधिकारी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना कळवितील. विद्यार्थी सुरक्षा विमा रक्कम ₹ ३०/— राहिल.

११) विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क, प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, गुणपत्रक शुल्क आणि प्रमाणपत्र शुल्क हे संबंधीत विद्यालयाच्या प्राचार्याकडे भरल्यानंतर प्राचार्य अर्जाची संपूर्ण छाननी करून उमेदवाराची यादी आणि शुल्क विद्यापीठाच्या नियंत्रकाच्या नावे धनादेश काढून उपकुलसचिव (विद्या) यांच्या कार्यालयाकडे पाठवतील.

१२) तात्पुरत्या स्वरूपात बोनाफाईडवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी दहा दिवसांच्या आत मूळ प्रमाणपत्रे संबंधित विद्यालयात जमा करणे अनिवार्य राहिल. अन्यथा त्याचा प्रवेश कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय रद्द करण्यात येईल.

१३) विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम/प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर अथवा प्रवेश रद्द केल्यानंतर त्यास जिल्हा बदली/स्थलांतरण प्रमाणपत्र (मायग्रेशन) हे संबंधित विद्यार्थ्यांना रितसर अर्ज व विहित शुल्क ₹ २००/— मात्र कुलसचिव कार्यालयात भरून प्राप्त करून घ्यावे.

**४. प्रवेश बदली**

१) एखाद्या विद्यार्थ्यांने प्राचार्यांमार्फत विनंती अर्ज केल्यास त्याला दुसऱ्या विद्यालयात प्रवेश बदलून देण्यात येईल. मात्र यासाठी दुसऱ्या विद्यालयात जागा रिक्त असणे आवश्यक आहे तसेच ज्या विद्यालयात प्रवेश घेतला आहे तेथील प्राचार्यांचा 'ना हरकत दाखला' आवश्यक, परंतु यासाठी सदर विद्यार्थ्याकडून उर्वरीत वर्षाचे शुल्क ज्या विद्यालयात विद्यार्थी बदली प्रवेश घेईल, तेथेच भरावे लागेल.

२) एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षा म्हणून विद्यालयाने/ विद्यापीठाने हजेरीपटावरून काढून टाकले असेल, अशा विद्यार्थ्याला प्रवेश बदलून मिळणार नाही.

३) विद्यार्थ्याचा प्रवेश बदल दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी होऊ शकेल, परंतु हया संधीचा लाभ फक्त एकदाच घेता येईल.

४) प्रवेश बदलीसाठी इच्छूक असणाऱ्या विद्यार्थ्यांला ₹ ५००/— एवढे शुल्क संबंधित विद्यालयात/तंत्र निकेतनात जमा करावे लागेल. हे शुल्क विद्यार्थ्यांला परत मिळणार नाही. यातील ₹ २५०/— संबंधित विद्यालयाकडे/तंत्र निकेतनाकडे राहातील तर ₹ २५०/— विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक आहे.

५) घटक/संलग्न अनुदानित विद्यालयातील विद्यार्थी दुसऱ्या घटक/संलग्न अनुदानित/ संलग्न विनाअनुदानित विद्यालयात/तंत्र निकेतनात प्रवेश बदलासाठी पात्र असेल. मात्र संलग्न विनाअनुदानित तंत्र निकेतनातील विद्यार्थी फक्त दुसऱ्या संलग्न विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतनातच प्रवेश बदलासाठी पात्र असतील.

६) विद्यार्थ्याचे प्रवेश बदल वरील नियमास अधिन राहून सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्या मंजूरीने करण्यात येतील.

**५. अभ्यासक्रम, अध्यापन आणि मूल्यमापन**

१) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम वार्षिक पध्दतीने मूल्यमापन करण्यात येईल.

२) चाचणी, सहामाही परीक्षा या संबंधित विद्यालयांमार्फत/तंत्र निकेतनामार्फत घेतल्या जातील. वार्षिक परीक्षा विद्यापीठामार्फत मार्च/एप्रिल मध्ये घेतल्या जातील.

३) तीन वर्षे कृषि तंत्रज्ञान पदविका या अभ्यासक्रमासाठी वार्षिक परिक्षा पध्दत अवलंबली जाते, तसेच तीन विषयासाठी ए. टी. के. टी. असल्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रथम/द्वितीय वर्षाच्या ज्या विषयात अनुत्तीर्ण झाला आहे त्या विषयाची परिक्षा त्या वर्षीच्या वार्षिक परिक्षेबरोबर दयावी. कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षात प्रवेश घेण्यासाठी प्रथम वर्षातील सर्व विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

४) वार्षिक परीक्षेला बसलेला परंतु काही कारणास्तव निकाल राखीव ठेवला असल्यास अशा विद्यार्थ्याला पुढील वर्षात तात्पुरता प्रवेश घेण्याची परवानगी दिली जाईल. मात्र अशा विद्यार्थ्याने मागील वर्षाचे विषय उत्तीर्ण केल्याशिवाय त्याचा पुढील वर्षाचा प्रवेश ग्राहय धरण्यात येणार नाही.

५) विद्यापीठाच्या विद्या परिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार कार्यानुभव व कृषि आधारीत उद्योग संबंधित विद्यार्थ्याला पूर्ण करावे लागतील.

**६. शुल्क परतावा**

१) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू होण्यापुर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी ₹ १,०००/— रक्कम कपात करण्यात येईल.

२) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास ₹ १,००० + वर्ग सुरू झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

३) वर्ग सुरू झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास ₹ १,००० + नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

४) पदविका अभ्यासक्रम अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर सदर विद्यार्थ्यास त्याचा व्यक्तीगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्याने भरलेली अनामत रक्कम (Caution Money) विद्यार्थ्यांना **अंतिम गुणपत्रक देते वेळी** परत केली जाईल.

**७. पुर्न:प्रवेश**

१) एखाद्या विद्यार्थ्याने कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्या पूर्व परवानगीने मध्येच सोडल्यास आणि त्याने तीन वर्षाच्या आत प्राचार्यामार्फत सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांना विनंती केल्यास त्याला पुर्न:प्रवेश देता येईल. परंतु त्यासाठी खाली अटी पूर्ण कराव्या लागतील.

- विद्यार्थ्याने कमीत कमी प्रथम/द्वितीय वर्षाची परीक्षा दिलेली असावी व पुढील वर्गात जाण्यास नियमानुसार पात्र असावा
- त्याने मधल्या कालावधीत प्रवेश रदद न केल्यास
- त्यावेळेस सदरचा अभ्यासक्रम सुरू असणे गरजेचे आहे.

**८. निवासी कालावधी**

निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेतल्यापासून किमान व कमाल कालावधी खालीलप्रमाणे राहील

| अभ्यासक्रम | किमान कालावधी (वर्षे) | कमाल कालावधी (वर्षे) |
|---|---|---|
| कृषि तंत्र पदविका | २ | ४ |
| कृषि तंत्रज्ञान पदविका | ३ | ६ |
| कृषि विज्ञान पदविका | २ | ४ |
| माळी प्रशिक्षण | १ | २ |

टिप:— उपरोक्त निर्देशित कमाल कालावधीत पदविका/प्रमाणपत्र अभ्सासक्रम पूर्ण केला नाही तर विद्यार्थ्यांचा संबंधित अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश रद्द होईल

**९. उपस्थिती**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने बौध्दिक तासिका, प्रयोगशाळेतील अथवा प्रक्षेत्रावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयीन काम, शैक्षणिक सहली, वर्गशिक्षक/प्राचार्यासोबतच्या बैठकी इत्यादीसाठी नियमितपणे उपस्थित राहणे सक्तीचे आहे.

२) प्रत्येक विषयाच्या बौध्दिक व प्रात्यक्षिक तासिकांसाठी विद्यार्थ्याची उपस्थिती ८० टक्के असली पाहिजे. असेच विद्यार्थी अंतिम परीक्षेसाठी पात्र ठरतील. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा वैद्यकिय कारणास्तव १० टक्के सूट देण्याचा अधिकार

सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांना असेल. तथापि, संबंधित विद्यार्थ्यांने वैद्यकिय कारण असेल तर वैद्यकिय अधिकाऱ्याचा दाखला किंवा इतर कारणास्तव तसा सबळ पुरावा प्राचार्यांमार्फत सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांना देणे आवश्यक आहे.

३) प्राचार्यांनी प्रत्येक महिन्याची हजेरी पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्याकडे पाठविणे बंधनकारक राहील.

४) विद्यापीठाने/विद्यालयाने/कृषि तंत्र निकेतनाने आयोजित केलेल्या क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या विद्यार्थ्यांने हजेरीची सवलत मिळविण्यासाठी संबंधित कृषि विद्यालयाच्या/तंत्र निकेतनाच्या प्राचार्यांकडे अर्ज करावा.

५) अपेक्षित हजेरी पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्याला परिक्षेत बसता येणार नाही.

६) विद्यार्थ्यांची एकूण हजेरी ८० टक्के पेक्षा कमी भरत असेल तर, संबंधित प्राचार्यांनी अशा विद्यार्थ्यांना परीक्षेत अपात्र ठरवून तसे परीक्षेपूर्वी सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांना कळविणे आवश्यक आहे. एखादा विद्यार्थी सतत ३० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास संबंधित विद्यालय/तंत्र निकेतनाचे प्राचार्य सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांना कळवतील. त्यानुसार सदर विद्यार्थ्यांचे हजेरी पटावरून नाव कमी करण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांना राहिल.

**१०. वार्षिक परीक्षा**

१) अंतिम परीक्षेसाठी बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नमुन्यामध्ये परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करावा लागेल.

२) विद्या परिषदेने संमत केलेल्या परीक्षा कार्यक्रमानुसार उपकुलसचिव या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षा प्रतिवर्षी मार्च/एप्रिल मध्ये आयोजित करतील. मुख्य पर्यवेक्षकाची नेमणूक मा. कुलसचिव यांचेमार्फत केली जाईल.

३) प्रश्नपत्रिकेचे स्वरूप २० टक्के ''वस्तुनिष्ठ'' आणि ८० टक्के ''वर्णनात्मक'' असतील. यामध्ये "अ" व "ब" विभाग असावेत. "अ" विभागात दहा ''वर्णनात्मक'' प्रश्न असावेत. "ब" विभागात दोन सक्तीचे "वस्तुनिष्ठ" प्रश्न असावेत.

४) सर्व विद्यालयांकडून नमुना प्रश्नप्रत्रिका व आदर्श उत्तर पत्रिका मागविण्यात येतील. त्यापैकी एक प्रश्नपत्रिका संच मा. सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने परीक्षेसाठी वापरला जाईल आणि एक प्रश्नपत्रिका आकस्मिक कारणांसाठी राखून ठेवली जाईल. प्रश्नप्रत्रिका व आदर्श उत्तर पत्रिका तयार करणाऱ्या सर्व प्राध्यापकाना व प्रश्नपत्रिका संच छपाई व देखरेख समितीच्या सदस्यांना विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दरानुसार मानधन देण्यात येईल.

५) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका/बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र/माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या लेखी/प्रात्यक्षिक परिक्षेकरिता विद्यापीठातील तसेच संलग्न आणि मान्यताप्राप्त विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा वापरण्यात येतील व त्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दराप्रमाणे मानधन देण्यात येईल.

६) पदविका/प्रमाणपत्र वार्षिक (लेखी व प्रात्यक्षिक) परिक्षांचे नियमन करण्यासाठी भरारी पथकांची नेमणूक करण्यात येईल. पथकातील सदस्यांना नियमाप्रमाणे मानधन देण्यात येईल.

७) लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेकरिता शिक्षक कर्मचाऱ्यांना त्यांचे मुख्यालय ते परीक्षा केंद्र आणि परत असा प्रवास करण्यासाठी शासकीय लेखा नियमांनुसार दैनिक भत्ता व प्रवास भत्ता देण्यात येईल. वार्षिक परीक्षेच्या (लेखी व प्रात्यक्षिक) सर्व कामांसाठी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दरानुसार संबंधित कर्मचाऱ्यास मानधन देण्यात येईल.

८) जर एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय कारणास्तव (सदर विद्यार्थी पेपर लिहिण्यास असमर्थ आहे असे वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक) लेखनीकाची आवश्यकता असेल तर त्यांनी मा. कुलसचिव यांच्या मान्यतेने इयत्ता ९ वी/१० वी उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्याला लेखनीक म्हणून वापरण्यास परवानगी देता येईल.

**११. उत्तरपत्रिकांचे** **उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाची पध्दत**

**मुल्यमापन**

१) सर्व परीक्षा केंद्रावरील उत्तरपत्रिका विद्यापीठ कार्यालयात आणण्यात येऊन उत्तरपत्रिकांना सांकेतिक क्रमांक (Coding) देण्यात येतील.

२) मूल्यमापनासाठी विद्यापीठातील तसेच संलग्न आणि मान्यताप्राप्त विद्यालयातील सहा. प्राध्यापक/ वरीष्ठ/कनिष्ठ संशोधन सहाय्यक/कृषि सहाय्यक (पदवीधर) इत्यादींच्या सेवा वापरल्या जातील.

३) परीक्षकांच्या संख्येनुसार उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तयार केले जातील.

४) उत्तर पत्रिकांचे मूल्यमापन विद्यापीठ कार्यालयांत/जिल्हा घटक व अनुदानित कृषि तंत्र विद्यालयात केंद्रिय पध्दतीने केले जाईल.

५) मूल्यमापन केलेल्या उत्तरपत्रिकेतील ५ टक्के उत्तरपत्रिकांचे समीक्षण विद्यापीठातील संबंधित विषयाचे सहयोगी/सहाय्यक प्राध्यापक अथवा घटक/अनुदानित कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य करतील व त्यानंतर निकाल तयार करण्यात येईल.

६) उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व समीक्षण केलेल्या मूल्यमापक/समीक्षक यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दरानुसार मानधन देण्यात येईल.

कार्यानुभव/कृषि आधारित उद्योग यांचे मूल्यमापन खालील प्रमाणे करण्यात येईल.

**अ) कार्यानुभव**

| अ. क्र. | मूल्यांकन घटक | गुण (१५०) |
|---|---|---|
| १. | कार्यानुभवातील नियमीतपणा | ३० |
| २. | कार्यानुभवाची अचूक व व्यवस्थित नोंद | ५० |
| ३. | कार्यनैपुण्य | ४० |
| ४. | कार्यानुभवातील क्षेत्रामधून मिळालेले उत्पन्न व नफा | ३० |

**ब) कृषि आधारित उद्योग**

| अ. क्र. | मूल्यांकन घटक | गुण /कृषि उद्योग (५० गुण) |
|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | १५ |
| २. | तोंडी परीक्षा/नमूना ओळखणे | १५ |
| ३. | • प्रकल्प अहवाल | १० |
| ४. | • कार्यानुभव/प्रात्यक्षिक नोंदवही | ५ |
| ५. | • कार्यानुभव मूल्यमापन व हजेरी | ५ |
| | **एकूण** | **५० गुण** |

• अंतर्गत मूल्यमापन

**१२. गुणांची टक्केवारी अणि निकाल**

१) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थास प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत स्वतंत्रपणे मिळविणे अनिवार्य आहे. दोन्हीपैकी एखाद्या भागात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर त्याला पुढील वर्षी होणाऱ्या लेखी व प्रात्यक्षिक अशी दोन्हीची परत परीक्षा द्यावी लागेल.

२) अतिम निकालानंतर विद्याथ्यांची खालील प्रमाणे वर्गवारी घोषित करण्यात येईल

| वर्ग/ श्रेणी | टक्केवारी |
|---|---|
| अनुत्तीर्ण | ३५ टक्के पेक्षा कमी गुण |
| उत्तीर्ण श्रेणी | ३५ टक्के पेक्षा अधिक आणि ४९.९९ टक्केपेक्षा कमी गुण |
| द्वितीय श्रेणी | ५० टक्केपेक्षा अधिक आणि ५९.९९ व त्यापेक्षा कमी गुण |
| प्रथम श्रेणी | ६० टक्केपेक्षा अधिक आणि ७४.९९ टक्केपेक्षा कमी गुण |
| विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी | ७५ टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण |

**१३. वरच्या वर्गात तात्पुरता प्रवेश (ए.टी.के.टी.)**

१) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेमध्ये जास्तीत जास्त तीन विषयात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमास तात्पुरता प्रवेश देण्यात येईल तसेच कृषि तंत्रज्ञान पदविकेच्या तीसऱ्या वर्षात प्रवेश घेण्यासाठी प्रथम वर्षातील सर्व विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

२) कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्रज्ञान पदविका/कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेमध्ये ज्या विषयांत तो विद्यार्थी अनुत्तीर्ण होता, ते विषय त्याने दुसऱ्या वर्षाच्या वार्षिक परीक्षेच्या वेळी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या वार्षिक परीक्षेस

बसून ते विषय सोडवावेत. मात्र कमी हजेरीच्या कारणास्तव अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

३) अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुर्न:परीक्षा देण्यासाठी त्या विषयासाठी परीक्षा अर्ज व विद्यापीठाने निर्धारीत केलेले परीक्षा शुल्क व गुणपत्रक शुल्क संबंधित विद्यालयाच्या प्राचार्यांकडे जमा करावे लागेल

४) परीक्षेत अनुचित साधनांचा वापर केल्यामुळे अनुत्तीर्ण घोषित झालेला विद्यार्थी ए. टी. के. टी. च्या सवलतीस पात्र असणार नाही.

**१४. सवलतीचे गुण (Grace marks)**

१) विद्यार्थ्याला त्याच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या कालावधीत ५ सवलतीचे गुण प्राप्त करण्यास पात्र असेल. सदरचे गुण हे त्याला कोणत्याही वर्षाकरीता आणि कितीही विषयांकरीता घेता येतील.

२) सवलतीचे गुण घेण्यासाठी विद्यार्थ्याने प्राचार्यांकडे अर्ज करावेत. प्राचार्यांनी अर्जांची छाननी करून परीपूर्ण प्रस्ताव त्यांच्या शिफारसीसह निकाल जाहिर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विद्यापीठास सादर करावेत. त्याप्रमाणे विद्यार्थ्यास ५ सवलतीचे गुण विद्यापीठामार्फत देण्यात येतील. ज्या विषयात सवलतीचे गुण दिलेले आहेत त्या विषयात उत्तीर्ण होणेसाठी दिलेल्या गुणांवर * असे चिन्ह राहिल व खाली टिपेमध्ये * सवलतीचे गुण असा शेरा देण्यात येईल.

**१५. गुण फेरतपासणी**

१) परीक्षेचा निकाल घोषित झाल्यानंतर प्राचार्य/ विषय शिक्षक / मूल्यमापक शिक्षक यांच्या निकालातील एखादी चूक लक्षात आल्यास त्यांनी ती उपकुलसचिव (विद्या/परिक्षा) यांना लगेचच कळवावी जेणेकरून विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये आवश्यक तो बदल करता येईल. अशा प्रकारची चूक पूर्वीचा निकाल पाठविल्यापासून सात दिवसांच्या आत कळविण्यात यावी.

२) विद्यार्थ्याला परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांची फेरतपासणी करून घ्यावयाची असल्यास परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून दहा दिवसांच्या आत संबधित प्राचार्य यांचे मार्फत प्रति विषयाकरीता ₹ २००/— (₹ दोनशे फक्त) तपासणी शुल्क भरून उपकुलसचिव (विद्या) यांच्याकडे अर्ज करावा लागेल.

३) विद्यार्थ्याला उत्तरपत्रिकेचे पुर्नमुल्यांकन करावयाचे असल्यास परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून दहा दिवसांच्या आत प्रति विषयासाठी ₹ ५००/— भरून प्राचार्यामार्फत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा लागेल. संबंधित विषय शिक्षकाकडून उत्तरपत्रिकाचे पुर्नमुल्यांकन करून त्यानंतर समीक्षण करण्यात येईल. उपकुलसचिव (विद्या) पुर्नमूल्यांकनाचा निकाल तयार करून मा. कुलसचिव यांच्या मान्यतेने संबंधित विद्यालयाला पाठवतील.

४) एखाद्या विद्यार्थ्यास उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत आवश्यक असल्यास परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून दहा दिवसांच्या आत प्रति विषयाकरिता रक्कम ₹ ५००/— भरून संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त करू शकेल.

**१६. दंडात्मक कार्यवाही**

कोणत्याही विद्यार्थ्याला दंड आदेश देण्यापूर्वी खालील पध्दती अनुसरण्यात येईल.

१) कोणत्याही गैरकृत्याबद्दल/गैरशिस्त वर्तनाबद्दल त्या घटनेची तक्रार आल्यानंतर प्राथमिक स्वरूपाची चौकशी गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यात येईल.

२) संबंधीत विद्यार्थ्याला त्याच्या समर्थनार्थ पुरावे सादर करण्याकरीता व त्याची बाजू मांडण्याकरीता तीन दिवसाचा कालावधी देण्यात येईल.

३) गैरवर्तन अथवा शिस्तभंगाची संपूर्ण नोंद केली जाईल. त्या अनुषंगाने समिती आपल्या कार्यवाहीच्या शिफारशीसह अहवाल संबंधीत प्राचार्यांकडे सादर करील. ही सर्व कार्यवाही आठ दिवसात पूर्ण करणे बंधनकारक असेल.

४) संबंधीत प्राचार्य विद्यार्थ्याला समितीच्या अहवालानुसार कारणे दाखवा नोटीस देतील अशा विद्यार्थ्याला आठ दिवसात किंवा या अगोदर स्पष्टीकरण देण्याची संधी दिली जाईल.

५) शिस्तभंगाचे प्रकरण शिक्षकांसमोर घडल्यास संबंधीतास त्याचवेळी विना चौकशी ₹ १००/— दंड करण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

६) गंभीर गैरशिस्तीचे प्रकरणामध्ये एखादा विद्यार्थी दोषी आढळून आल्यास सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्या अधिकारात त्या विद्यार्थ्याला कृषि तंत्र विद्यालयातून/ कृषि तंत्र निकेतनातून/ग्रामीण शिक्षण संस्थेतून/माळी प्रशिक्षण केंद्रातून काही काळाकरीता काढून टाकू शकतील किंवा त्याला त्या अभ्यासक्रमाकरीता एक वर्षाच्या कालावधीपर्यत कृषि तंत्र विद्यालयातून/कृषि तंत्र निकेतनातून/ग्रामीण शिक्षण संस्थेतून/माळी प्रशिक्षण केंद्रातून निलंबित करू शकतील अथवा त्याला जास्तीत जास्त ₹ १,०००/— दंड करतील किंवा त्याला विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परिक्षेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यत वंचीत ठेवतील. त्याशिवाय त्यांच्या अधिकारात गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल प्रलंबित ठेवू शकतील अथवा रद्द करू शकतील. शिस्तभंगाची कार्यवाही करण्यापूर्वी विद्यार्थ्यांस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

७) कृषि तंत्र विद्यालय/निकेतन/ग्रामिण शिक्षण संस्था/माळी प्रशिक्षण केंद्राबाहेर गैरकृत्य करतांना आढळून आलेल्या विद्यार्थ्यांवर पोलीस केस झाली असेल तर, त्या विद्यार्थ्याला गुन्हयाचे स्वरूप पाहून कृषि तंत्र विद्यालयातून/निकेतनामधून/ ग्रामिण शिक्षण संस्था/माळी प्रशिक्षण केंद्रातून कायमचे काढून टाकणे अगर एक, दोन, तीन वर्षे काढून टाकणे किंवा परिस्थितीनुसार शिक्षा देण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांना राहतील.

८) कुलगुरूंच्या अधिकाराला बाधा न आणता सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांना त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या निम्नस्तर शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थी शिस्तपालनाच्या दृष्टीने अधिकार असतील व त्या अधिकाराचा वापर ते शिस्त राखण्यासाठी करू शकतील.

**१७. अनुचित साधनांचा वापर**

१) वार्षिक परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या अनुचित साधनांचा वापर करण्यापासून रोखण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित विद्यालयांच्या प्राचार्यांची राहील.

२) अनुचित मार्गाचा अवलंब

- परीक्षेदरम्यान एखादा परिक्षार्थी अनुचित मार्ग अवलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उत्तरपत्रिका आणि आक्षेपार्ह साहित्य ताब्यात घेऊन त्यास नवीन उत्तरपत्रिका उर्वरीत प्रश्न सोडविण्यासाठी देण्यात यावी.
- वरीष्ठ पर्यवेक्षकांनी आक्षेपार्ह सामुग्री मोहोरबंद करून त्यावर संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी
- याबाबतीत विद्यार्थ्याचा आणि अन्य उपस्थित कर्मचाऱ्यांचा जबाब घ्यावा. विद्यार्थ्याने सही देण्यास नकार दिल्यास वरीष्ठ पर्यवेक्षकाने त्यासंबंधीचा अहवाल तयार करून त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी व तो अहवाल सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्याकडे सादर करावा.
- विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका, संबंधिताचा जबाब व साहित्य मोहोरबंद करून वरिष्ठ पर्यवेक्षक यांच्या शिफारशीसह त्याच दिवशी सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांचेकडे पाठवावे.
- या संदर्भात सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) स्वत: अगर चौकशी समितीमार्फत संबंधित विद्यार्थ्यांची बाजू ऐकून घेऊन त्याबाबतचा अहवाल मा. कुलसचिव यांना सादर करतील.
- चौकशीत विद्यार्थी दोषी ठरल्यास त्याला त्या वर्षाच्या सर्व विषयांमध्ये अनुत्तीर्ण ठरविले जाईल.
- चौकशीत विद्यार्थी निर्दोष आढळल्यास त्याच्या दोन्ही उत्तरपत्रिकांची तपासणी करून त्याचा निकाल जाहीर केला जाईल.

३) विद्यार्थ्याने परीक्षा कक्षात अभ्यासक्रमासंबंधी कुठलीही कागदपत्रे स्वत:जवळ बाळगणे, अपेक्षित प्रश्नांची उत्तरे जवळ ठेवणे, आसनावर किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवावर उत्तरे लिहून आणणे हे गैरप्रकार समजले जातील. अशा कृत्यांची चौकशी करून त्याला त्या विषयात अनुत्तीर्ण म्हणून घोषित करण्यात येईल.

४) परीक्षेच्या वेळी आपसात बोलणे, उत्तरपत्रिकांची अदलाबदल करणे अथवा दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तराची नक्कल करणे किंवा पुरवणी दुसऱ्याला देणे अथवा दुसऱ्याकडून घेणे हे सर्व गैरप्रकार आहेत. अशा विद्यार्थ्यांची त्या विषयाची उत्तरपत्रिका परीक्षेतून काढून घेण्यात येईल.

५) उत्तरपत्रिकेतील पान काढणे आणि पुरवणी घेऊन ती न जोडणे अथवा तिचा दुरूपयोग करणे हा गैरप्रकार समजण्यात येईल व त्या विद्यार्थ्यांला त्या विषयात अनुत्तीर्ण करण्यात येईल.

**१८. अंतिम परीक्षेचे गुणपत्रक**

१) कृषि तंत्रज्ञान पदविका गुणपत्रकात प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विषयात प्राप्त गुणांचा उल्लेख असेल. या तीन वर्षांच्या गुणांच्या सरासरीवर श्रेणी देण्यात येईल.

२) अंतिम गुणपत्रक विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेले शुल्क भरल्यानंतर देण्यात येईल. त्या गुणपत्रकावर उपकुलसचिव (विद्या) यांची स्वाक्षरी असेल.

३) १० वी व १२ वी नंतर प्रवेश घेणाऱ्या कृषि तंत्रज्ञान पदविकेसाठी गुणपत्रकाचे दोन स्वतंत्र नमूने असतील. १० वी उत्तीर्ण होऊन कृषी तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी १ व २ आणि सामान्य विज्ञान १ व २ या विषयांचे मुल्यमापन श्रेणीवर (अ,ब,क,ड) आधारित केले जाईल.

४) १२ वी शास्त्र उत्तीर्ण होऊन कृषी तंत्रज्ञान अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी १ व २ तसेच सामान्य विज्ञान १ व २ या विषयात त्यांना सुट दिली जाईल व त्यांच्या गुणपत्रकांत सदर विषयांपुढे Exempt (सुट) असे नमुद केले जाईल.

५) कृषि तंत्र पदविका उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम व द्वितीय वर्षातील विषयात प्राप्त गुणांची गुणपत्रिका देण्यात येईल. त्या दोन वर्षांच्या गुणांच्या सरासरीवर श्रेणी देण्यात येईल.

**१९. प्रमाणपत्र**

१) विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले प्रमाणपत्र अधिष्ठाता (कृषी) व संचालक (शिक्षण) यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाद्वारे प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला देण्यात येईल. याकरीता विद्यार्थ्यांस विद्यापीठाने निर्धारित केलेले प्रमाणपत्र शुल्क विद्यापीठकडे जमा करावे लागेल.

२) प्रमाणपत्रामध्ये अभ्यासक्रमाचे नाव, विद्यार्थ्याचे नाव, प्रमाणपत्र दिल्याची तारीख अणि विद्यार्थ्याला मिळालेली श्रेणी यांचा उल्लेख असेल.

३) विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अथवा पूर्ण करण्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास विहित नमुन्यातील शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र (टी. सी.) नियमाप्रमाणे संबंधित शिक्षण संस्थेकडून देण्यात येईल. या प्रमाणपत्रासाठी शुल्क ₹१००/– संबंधित संस्थेत भरावे लागेल.

४) एखाद्या विद्यार्थ्याकडून मूळ गुणपत्रक अथवा प्रमाणपत्र हरविले गेल्यास ते विद्यार्थ्याला पुन्हा प्राप्त करता येईल. त्यासाठी खालील अटींची पुर्तता करावी लागेल.

- मागणी अर्ज ₹५००/– च्या शुल्कासहीत विद्यापीठाकडे सादर करावा
- गुणपत्रक/प्रमाणपत्र पोस्टाने (RPAD) हवे असल्यास रक्कम ₹५०/– (₹ पन्नास मात्र) अतिरिक्त शुल्क द्यावे लागेल.
- मा. तहसिलदार यांचे समोर गुणपत्रक/प्रमाणपत्र हरविले असल्याचे ₹ १००/– च्या मुद्रांकिंत कागदावर तयार केलेले शपथपत्र सादर करावे लागेल
- संबंधित पोलीस ठाण्याने तपास केला असल्याचा अहवालही सादर करावा लागेल.
- सदर प्रत हरवल्याबाबत वर्तमानपत्रातील जाहिरातीची छायांकित प्रत सादर करावी.
- उपकुलसचिव (विद्या) यांच्या सहीने त्या गुणपत्रक/प्रमाणपत्राची नक्कल (डुप्लीकेट) दिली जाईल.

५) जर एखादा विद्यार्थी अथवा संस्था यांनी गुणपत्रक/प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरीता विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केल्यास प्रत्येकी ₹ ५००/– प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

६)
- बोनाफाईड प्रमाणपत्रासाठी ₹५०/– शुल्क आकारावे. सदर शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थेच्या जिमखानामध्ये जमा करावी.
- हॉल टिकीट/परिक्षा गृहप्रवेश पत्र हरवल्यास द्वितीय प्रतीसाठी ₹ ५०/– शुल्क आकारावे. संबंधित शुल्काची रक्कम विद्यापीठ निधीमध्ये जमा करावी.

**२०. निकालामध्ये दुरूस्ती आणि स्थगिती**

१) या अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचा निकाल घोषित झाल्यानंतर सदर निकालामध्ये काही त्रुटी आढळल्यास अथवा नजरचुकीने एखाद्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत त्रुटी राहील्यास सदर निकालामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा पूर्ण अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरूंना राहील. या बाबत आवश्यक ती कार्यवाही करून मा. कुलगुरू जो आदेश काढतील तो आदेश संबंधिताना बंधनकारक राहील.

२) मा. कुलगुरूंनी दिलेल्या निकालानुसार कुलसचिव अधिसूचना काढून सुधारीत निकाल जाहीर करतील.

**२१. हजेरीपटावरून नाव कमी करणे/प्रवेश रद्द करणे.**

मा. सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण) यांच्या परवानगीने विद्यार्थ्याचे नाव खाली नमूद कारणास्तव हजेरीपटावरून कमी करू शकतील

- निर्धरित शुल्क ठराविक दिवशी किंवा त्यापूर्वी मा. सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य यांचेकडे विहित मुदतीत न भरल्यास
- प्राचार्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय सतत ३० दिवस किंवा जास्त दिवस वर्गात गैरहजर राहिल्यास.
- शिक्षकासमोर अनादाराची वर्तणुक किंवा विद्यापीठाच्या/ संस्थेच्या स्थावर मालमत्तेचे हेतुपुरस्पर नुकसान केल्यास, संपात भाग घेतल्यास किंवा निर्दशने केल्यास, अडवणूक केल्यास किंवा कोणत्याही प्रकारे विद्यापीठ किंवा शिक्षकांना कमीपणा येईल अशी गैरशिस्तीची वर्तणुक केल्यास.
- विद्यापीठ/विद्यालय/वसतिगृह यांच्या नियमांचा भंग केल्यास.
- प्रश्नपत्रिकेची किंवा उत्तरपत्रिकेची परीक्षेअगोदर वा नंतर चोरी किंवा नुकसान केल्यास

**२२. शिस्त पालन**

१) महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील कलम ६५ च्या तरतुदीनुसार विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखली जाईल.

२) महाराष्ट्र शासनाच्या रॅगींग प्रतिबंधक आदेश क्रमांक ३३, दिनांक १३ मे १९९९ व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या २००९ च्या निकालानुसार विद्यालयामध्ये रॅगिंग करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी विद्यार्थी दोषी आढळल्यास तो या कायद्यानुसार शिक्षेस पात्र राहील.

**२३. विद्यार्थ्यांची जबाबदारी**

निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रम शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्वसामान्य बाबींची पूर्णपणे माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील असणे अपेक्षित आहे. त्यांनी कृषि तंत्र विद्यालयाशी/कृषि तंत्र निकेतनाशी सतत संपर्क साधून असले पाहिजे. केवळ नियमाविषयीचे अज्ञान हे कोणत्याही नियमाच्या अस्वीकृतीला कारण होऊ शकणार नाही.

**२४. व्यावृत्ती**

प्रस्तुत नियमावलीत कोणताही बदल किंवा सुधारणा सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी केल्याप्रमाणे मा. कुलगुरू ठरवितील त्या दिवसापासून त्या दिवशी जे विद्यार्थी हजेरीपटावर हजर असतील किंवा त्या नंतरच्या तारखेला असतील त्या विद्यार्थ्यांना लागू होतील. तसेच या नियमावलीतील तरतुदी अंमलात आणण्याबाबत किंवा त्याच्या अर्थाविषयी काही अडचण उपस्थित झाल्यास त्याबाबत मा. कुलगुरू यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

## वसतीगृहाचे नियम

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० चे अधिन राहून निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखेतील वसतीगृहासाठी नियम खालीलप्रमाणे असतील.

**संक्षिप्त व्याख्या व अंमलबजावणी**

१) या नियमाना निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखेच्या वसतीगृहाचे नियम २०१४ म्हणून संबोधले जाईल.

२) हे नियम शैक्षणिक वर्ष २०१४ पासून अंमलात येतील.

३) वेळोवेळी अस्तित्वात असलेल्या या नियमाबरोबरच हे नियम निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखे अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व सर्व विना अनुदानीत संस्थांना सारखेच लागू राहतील.

**व्याख्या**

१) **विद्यार्थी** विद्यार्थी म्हणजे ज्या व्यक्तीने कृषि तंत्र पदविका/ कृषि तंत्रज्ञान पदविका/बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम किंवा तत्सम अभ्यासक्रम पुर्ण करण्याकरिता नोंदणी केलेली आहे अशा व्यक्ती.

२) **प्राचार्य** विद्यालय अधिक्षक/प्राचार्य पदी काम करणारी व्यक्ती विद्यालयाच्या शैक्षणिक प्रशासकीय आणि आर्थिक व्यवहारास जबाबदार व्यक्ती.

३) **वसतीगृह प्रमुख** वसतीगृह प्रमुख पदी काम करणारी व्यक्ती वसतीगृह व्यवस्थापन आणि वसतीगृह आर्थिक व्यवहारास जबाबदार व्यक्ती.

**नियम**

शिस्त पालनाचे नियमात खालील बाबीमधील प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग गैरकृत्य समजण्यात येईल.

१) विद्यार्थ्यांच्या कोणत्याही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कृत्यामुळे संबंधीत संस्थेच्या कार्यात अडथळा निर्माण होत असेल किंवा अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असेल असे कोणतेही कृत्य.

२) विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय पैशाच्या अथवा वस्तुंच्या स्वरूपात बेकायदेशीर रित्या वर्गणी गोळा करणे तसेच वर्गणी गोळा करण्यासाठी प्रचारात किंवा वर्गणी स्वीकारण्यात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग.

३) प्रवेश घेतेवेळी खोटी माहिती देणे, आवश्यक ती माहिती लपविणे किंवा सत्य गोष्टी लपविणे.

**वसतीगृहाचे नियम**

१) विद्यार्थ्यांना जेथे सोय असेल त्या वसतीगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

२) वसतीगृहात रात्री १०.०० नंतर विद्यार्थ्यांला प्रवेश दिला जाणार नाही.

३) वसतीगृहात रात्री १०.०० नंतर सतत ३० दिवस गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांस वसतीगृहातून काढून टाकण्यात येईल.

४) वसतीगृहाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांस विद्यालय सुरू होण्यापुर्वी संबंधित प्राचार्य/अधिक्षकाकडे लेखी अर्ज करावा लागेल. प्राचार्य/अधिक्षक गुणवत्तेनुसार व आरक्षित जागांच्या टक्केवारी प्रमाणे विद्यार्थ्यांना वसतीगृहात राहण्यास अनुमती देतील.

५) वसतीगृहाबाबतचे पूर्ण नियंत्रण प्राचार्य/अधिक्षकाकडे राहील व त्यांना मदत करण्याकरिता वसतीगृह प्रमुख नेमला जाईल.

६) प्राचार्य/अधिक्षक विद्यार्थ्यांच्या खोल्या बदलू शकतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे खोल्या बदलता येणार नाहीत. असे प्रकार आढळून आल्यास प्राचार्य/ अधिक्षक संबंधित विद्यार्थ्यांस वसतीगृहातून काढून टाकू शकतील.

७) वसतीगृहातील सर्व खोल्या तपासणी करीता दिवसा किंवा रात्री वसतीगृह प्रमुख अथवा इतर अधिकारी यांना उघडून द्याव्या लागतील. खोली उघडण्यास कुणी नकार दिल्यास ती जबरदस्तीने उघण्यात येईल व अशा विरोध करणाऱ्या विद्यार्थ्याला वसतीगृहातून काढून टाकण्यात येईल.

८) गरज व निकडीच्या वेळी विद्यार्थ्यांना खोल्या विशिष्ट काळा करिता रिकाम्या करून द्याव्या लागतील. जर खोल्या रिकाम्या करण्याबाबत अथवा उघडण्याबाबत नकार दिला तर बळजबरीने उघडण्यात येतील.

९) वसतीगृहातील एखादी वस्तू विद्यार्थी एका ठिकाणावरून दुसरीकडे हलवू शकणार नाही अथवा स्वत:च्या खोलीत नेऊ शकणार नाही असे प्रकार आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यांना योग्य ती शिक्षा करण्यात येईल.

१०) खोलीत स्वयंपाक करण्यास व इतर प्राणी पाळण्यास परवानगी असणार नाही, सांडपाणी टाकणे ही गंभीर बाब समजून अशा विद्यार्थ्यांना प्राचार्य/अधिक्षक वसतीगृहातून काढून टाकू शकतील.

११) वसतीगृह परिसर, स्वच्छतागृह, स्नानगृह व स्वत:ची खोली स्वच्छ, निटनेटकी व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील, पाहणी मध्ये व या नियमाचा भंग झाल्याचे आढळून आल्यास संबंधित विद्यार्थी दंडास पात्र राहील. तसेच स्वच्छता कामासाठी ठेवलेल्या मजूरास सर्व सहकार्य देवून वसतीगृहाचा परिसर स्वच्छ राखावा लागेल. वसतीगृहातील कोणत्याही वस्तूची मोडतोड किंवा दिलेल्या सामानाचे नूकसान केल्याचे आढळून आल्यास वस्तूंची बाजारातील किंमत विचारात घेवून विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येईल.

१२) इतर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येईल अशा प्रकारे वाद्य वाजविणे, मोठमोठयाने बोलणे, रेडिओ, डि. व्ही. डी. इत्यादी लावणे असे कृत्य गुन्हा समजण्यात येईल.

१३) वसतीगृहाच्या संपूर्ण परिसरात कोठेही मादक पेय बाळगणे अथवा सेवन करणे हा शिस्तभंग होय व त्याबाबत कडक कार्यवाही करण्यात येईल. तसेच वसतीगृहात जुगार खेळण्यास बंदी राहील.

१४) प्राणघातक हत्यारे बाळगणे ही बाब गंभीररित्या घेतली जाईल व संबंधित विद्यार्थ्यांवर कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येईल.

१५) विजेच्या शेगडया, स्टोव्ह, ईस्त्री इत्यादी वस्तू वसतीगृहात वापरता येणार नाहीत.

१६) वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्याला जर गावी जावयाचे असेल तर तशी पूर्व परवानगी घेवूनच वसतीगृह सोडावे लागेल.

१७) विद्यार्थ्यांच्या नातेवाईकास पूर्व परवानगी शिवाय वसतीगृहामध्ये राहता येणार नाही.

१८) सुट्टीच्या काळात व अंतिम परिक्षेनंतर गावी जाते वेळी अथवा कायमचे विद्यालय सोडते वेळी खोलीतील संपूर्ण सामान वसतीगृह प्रमुख यांना हस्तांतरीत करून जावे लागेल व तसे न केल्यास सामानाची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील.